# महिलासाठी स्वंयरोजगाराच्या संधी

**Dr. Iliyas. G. Bepari***
Associate Professor
Athawale College of Social Work, Bhandara

**Divya Jadav****
*Athawale College of Social Work*
*Bhandara*

**गोषवारा:**
*रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन ही यंत्रणा दुसऱ्या महायुध्दात जखमी झालेल्या सैनिकाचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली जुलै 1945 मध्ये स्थापन करण्यात आली आहे. ही सेवा 1946 पर्यत सैनिकांच्या पुनर्वसनासंबंधाने कार्यरत होती. या सेवेचा विस्तार 1948 पासून बेरोजगार उमेदवारांसाठी देशभरात सेवायोजन कार्यालयाच्या माध्यमातून सुरू करण्यात आला. तथापि या संदर्भातील आवश्यकता विचारात घेवून केंद्र शासनाने देशातील लोकसंख्येच्या प्रमाणात सेवायोजन सेवेचा प्रभावी लाभ कशा प्रकारे जनतेला देता येईल याचा विचार करण्यासाठी 1952 साली. श्री. बी. शिवराव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने सेवायोजन यंत्रणेची संरचना व कार्य यांचा अभ्यास करून त्यात काही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास तशा शिफारशी करावयाच्या होत्या. त्यानुसार समितीने 1954 साली केलेल्या शिफारशी विचारात घेवून केंद्र शासनाने सेवायोजन संघटनेच्या पुनर्रचनेत व्यावसायिक संशोध, व्यवसाय मार्गदर्शन आणि सेवायोजन क्षेत्राची माहिती इ. बाबीचा समावेश केला. त्याचप्रमाणे या संघटनेच्या दैनंदिन प्रशासनाच्या दृष्टिने सेवायोजन सघटनेचे कामकाज राज्य शासनाकडे 1 नोव्हेंबर 1956 साली हस्तातंरीत केले.*

*रोजगार व स्वयंरोजगार संघटनेचे कामकाज प्रभावीपणे करण्यासाठी लोकसभेद्वारे सेवायोजन कार्यालये अधिनियम 1959 पारित करण्यात येवून तो दिंनाक 1 मे 1960 च्या नियमावलीन्वये लागू करण्यात आला. या कायद्यातील तरतुदीनुसार 25 व त्यापेक्षा जास्त कामगार/कर्मचारी असणाऱ्या खाजगी आस्थापना आणि सार्वजनिक क्षेत्रांना त्यांच्याकडील रिक्त पद अधिसुचित करण्याचे व त्यांच्याकडे असणाऱ्या मनुष्यबळाची माहिती देण्याचे बंधन आहे. सेवायोजन संबंधाचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडून सेवायोजन कार्यालयामार्फत राबविले जातात. राज्यपातळीवर असे निर्णय राबविण्याची जबाबदारी आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, महाराष्ट्र राज्य असते. या संचानालयाच्या अधिपत्याखाली राज्यातील सर्व रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राचा कारभार चालविला जातो.*

***Key Word :***
*कुटीरउद्योग, लघुउद्योग, नक्षीकाम भरतकाम, संगणम, हस्तकला.*

**प्रस्तावना:**
आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये महिलांची भूमिका गतिमान झाल्यामुळे महिला उद्योजक ही संकल्पना पुढे आली आहे. व्यवसायाच्या वेगवेगळया क्षेत्रामध्ये महिलांची संख्या वाढली असून त्यांचा स्वतंत्र अभ्यास करण्याची आवश्यकता वेगवेगळया व्यासपीठांवरून मांडण्यात येवू लागली. जागतिक स्तरावर 1980 मध्ये कोपनहेरान येथे संयुक्त राष्ट्रांचे दशक यावर जागतिक परिषद घेण्यात आली होती. त्यामध्ये महिलांच्या स्वयंरोजगाराच्या संधी व त्याबाबतच्या जबाबदाऱ्या, अपारंपारिक उद्योग क्षेत्रामध्ये महिलांना संधी, व्यवस्थापन पातळीवर महिलांची भूमिका इत्यादी विषयावर चर्चा होवून महिलांसाठी एक कृती कार्यक्रम आखण्यात आला. त्या अनुषंगाने नोव्हेंबर 1981 मध्ये नवी दिल्ली येथे महिला उद्योजकांचे पहिले राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये व्यवसायाच्या दृष्टिने सर्व प्रकाराच्या सुविधा महिला उद्योजकांना देण्याचे ठराव करण्यात आले. या पार्श्वभूमीवरूनच महिला उद्योजकांची संकल्पना उदयास आली. उद्यमतेत स्त्रीचा सहभाग पुरूषांच्या तुलनेत नवीनच आहे. हा सहभाग प्रामुख्याने 20 व्या शतकाच्या उत्तरार्थ व 21 वे शतक यातीलच आहे. मुख्यत: युरोपियन राष्ट्रे, अमेरिका तसेच जपान, कोरिया, कॅनडा या सारख्या पुढारलेल्या व प्रगत राष्ट्रातूनच महिला उद्योजकांची प्रगती समाधानकारक झालेली दिसून येते. प्रगत राष्ट्र म्हणून अमेरिकेतील महिला उद्योजकांचा विचार केल्यास उटाह, अरिझोना, नेवाडा ही तीन महिला उद्योजकतेच्या प्रगतीबाबत पुढारलेली राज्ये आहेत. इकोफेडली उत्पादन अशा अनेक अपांरपारीक उद्योगात महिला उद्योजकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. तसेच टेलिकम्युनिकेशन मानव विकास सेवा, जहाजबांधणी आणि माहिती तंत्रज्ञान या चार क्षेत्रामध्ये तर महिला उद्योजकांचा व्यावसायिक खर्च अनुक्रमे 103 बिलियन डॉलर एवढा प्रचंड आहे. सांख्यिकीय माहितीवरून असे म्हणता येईल

की, भारतासारख्या इतर विकसनशील देशांपेक्षा अमेरिकेत खाजगी क्षेत्रातील उद्योगात 50 टक्के पेक्षा जास्त महिला उद्योजाकांची संख्या असून रोजगार वृध्दी. उत्पादन वृध्दी आणि उद्योगा संदर्भातील सर्व निर्णय इत्यादी बाबतीत महिला उद्योजक पुढारलेल्या आहेत. महिला उद्योजकांच्या उल्लेखनिय प्रगतीमुळे अशा देशाचा आर्थिक विकास दर जास्त असतो. अलिकडच्या काळात विकसित व विकनसिल अशा दोन्ही समाजामध्ये स्त्रिया स्वतः पुढाकार घेवून उद्योजकतेची भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द झाल्या आहेत.

महिला उद्योजकांच्या कार्याच्या आधारे त्यांची भुमिका स्पष्ट होते. आर्थिक विकासाच्या दृष्टिने महिला उद्योजकांची भुमिका संधी शोधकर्ती म्हणून सर्वात महत्वाची आहे. कुशल संघटन, जोखीम, नवनिर्मिती, कार्यक्षम व्यवस्थापन, प्रगत तंत्रज्ञान व परिणामकारक नियंत्रण अशा विविध भूमिका स्त्री एक उद्योजक म्हणून समर्थपणे पार पाडत आहे. त्यासाठी तिला अनेक आर्थिक, सामाजिक समस्यानांही सामोरे जावे लागते.

**स्वंयरोजगार म्हणजे काय :**

शिक्षणानंतर सर्वच जण नोकरीच्या शोधात असतात पण पुष्कळदा तुम्हाला तुमच्या शैक्षणिक योग्यतेची नोकरी मिळत नाही. अशा परिस्थित स्वंयरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. स्वयंरोजगार या शब्दाचा अर्थ स्वतःच स्वतःसाठी रोजगार उपलब्ध करणे आणि त्याद्ववारे अर्थारजन करणे असा होतो. नोकरी न करता स्वयंरोजगाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन तितकासा सकारात्मक नाही. त्यामुळे आणि योग्य माहिती अभावी आजही स्वयंरोजगारापेक्षा नोकरीलाच प्राधान्य दिले जाते. खरे तर योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमांची जोड मिळाल्यास स्वंय रोजगाराच्या माध्यमातून नोकरीपेक्षा कितीतरी जास्त आर्थिक विकास साध्य करणे शक्य आहे. याशिवाय स्वंय रोजगाराच्या माध्यमातून स्वतः बरोबरच इतरांसाठीही रोजगाराची संधी निर्माण करणे शक्य आहे. स्वाभिमानाने स्वतःचा आर्थिक विकास साधायचा असेल तर स्वंयरोजगारासारखा दुसरा चांगला मार्ग नाही.

**स्वंयरोजगारः**

चरितार्थ चालवणे यासाठी पैसे कमावणे आवश्यक असते. पैसे मिळवण्यासाठी माणसाला नोकरी करणे किंवा आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करणे क्रमप्राप्त असते. स्त्री उद्योजक म्हणजे स्त्री उद्योजक आणि स्त्रियांची उद्योजकता हया संज्ञची व्याख्या करणे अवघड आहे. तरीही जेव्हा एखादी महत्वकांक्षी आणि अभिप्रेरित स्त्री स्वतः पुढाकार घेवून उद्योजकांची भुमिका स्विकारते आणि ही भुमिका पार पाडण्यासाठी आवश्यक प्रयत्न करते. तेव्हा अशा स्त्रिला स्त्री उद्योजक असे म्हणता येईल.

A women enterprise means an enterprise owned and controlled by women with a minimum financial inerest of 51 % of the Capital & giving at least 51 % of the employment in the enterprise to women.

**भारतातील महिला उद्योजकता विकासः**

कोपनहेगन ची जागतिक परिषद व भारतातील राष्ट्रीय संमेलन हया पार्श्वभूमीवर भारतामध्ये महिला उद्योजक ही संज्ञा प्रथमच उदयास आली. संयुक्त राष्ट्राने 1978 मध्ये व्हिएन्नामध्ये सर्वप्रथम प्रगत देशांच्या औद्योगिकरणातील महिलांची भूमिका हयाबाबत आपल्या औद्योगिक विकास संघटनेच्या बैठकीमध्ये चर्चा केली. थोडक्यात महिला उद्योजकांच्या विकासासाठी 1978 हे वर्ष आधारवर्ष धरण्यात हरकत नाही. तेव्हापासून आजपर्यत 25 वर्षात महिला उद्योजकांनी लक्षणीय प्रगती साधली आहे. भारतामध्ये सुध्दा 1970 च्या दरम्यान महिला उद्योजकता ही संकल्पना लोकप्रिय झाली. 1970 नंतर महिला उद्योजकता विकासासाठी केंद्र सरकारने अनेक संघटना आणि योजना सुरू केल्या. त्यामुळे मोठया प्रमाणात स्त्री उद्योजकांची संख्या वाढली. 1990 च्या दरम्यान स्त्रिया विविध क्षेत्रातील उच्च शिक्षण, धाडस, आत्मविश्वास, महत्वकांक्षा यामुळे मोठया उद्योगातील धोकेही स्वीकारू लागल्या 21 व्या शतकात महिला आज टेलिकॉम, माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात कुशल होताना दिसून येत आहेत.

1981 च्या जगनणेनुसार एकुण उद्योजकांच्या फक्त 5 टक्के स्त्री उद्योजक शेती, हातमाग, गृहउद्योग अशा संघटीत क्षेत्रातील उद्योगात व्यस्त होत्या. 1988–89 च्या दरम्यान 1 लाख 53 हजारापेक्षाही जास्त स्त्री उद्योजकांची संख्या वाढली

आहे. तर 1995–96 मध्ये एकूण 2 लाख 85 हजार सातशे इतकी महिला उद्योजकांची संख्या वाढलेली दिसून येते. तसेच 2003 पर्यत सुमारे महिला उद्योजकांची संख्या 22 लाखांवर गेलेली दिसून येते.

एका अंदाजानुसार 21 व्या शतकाच्या प्रारभी भारतात दरवर्षी 1 लाख 50 हजारापेक्षाही जास्त स्त्री उद्योजक निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतातील महिला उद्योजकांनी काही विशिष्ठ उद्योगामध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. विविध उद्योग आणि त्यांना मिळणारे महिला उद्योजकांकडून प्राधान्य विचारात घेण्यासारखी आहे.

**महिला उद्योजकांचे उद्योगक्षेत्र व त्यांची क्षेत्र**

| श्रेणी | उद्योग | श्रेणी | उद्योग |
|---|---|---|---|
| 1. | कॉस्मेटीक आणि ब्युटीपार्लर | 6 | हस्तकला |
| 2 | गारमेटस आणि टेक्सटाईल्स | 7 | स्थायसेस आणि पापड |
| 3 | एज्युकेशन आणि ट्रेनिंग | 8 | सल्लागार सेवा |
| 4 | इंटिरिअर डेकोरेशन | 9 | मेडीकेअर |
| 5 | नर्सरी | 10 | इंजिनिअरिंग |

आर्थिक विकासाच्या योगदानात महिला उद्योजकांचा मालाचा हिस्सा आहे. साधारणतः महिला अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात एक महिला कामगार महिला उद्योजक स्वंयरोजगारातील महिला उद्योजकांची संख्या हळूहळू कमी होतांना दिसून येत आहे.

**भारतातील महिला उद्योजंकाचे उद्योग क्षेत्रनिहाय विभाजन**

| अ.क | उद्याग क्षेत्र | शे. प्रमाण |
|---|---|---|
| 1 | लघुउद्योग क्षेत्र | 60.00 |
| 2 | मोठे उद्योग | 15.00 |
| 3 | अतिलघु व गृहउद्योग | 25.00 |

**भारतातील 20 मोठया उद्योगातील महिला उद्योजक**

| अ.क | उद्योग | महिला उद्योजकांची संख्या | शे. प्रमाण | अ.क | उद्योग | महिला उद्योजकांची संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खाजगी गृहसेवा | 77.239 | 13.7 | 12 | कपडे विक्रते आणि अन्य | 09.616 | 1.7 |
| 2 | शिशुसंगोपन सेवा | 51.807 | 9.2 | 13 | दुकानातील मदतनीस | 09.616 | 1.7 |
| 3 | रेस्टॉरंट आणि इतर सेवा | 46.519 | 8.3 | 14 | घरगुती आरोग्यसेवा | 09.818 | 1.7 |
| 4 | ब्युटीसलून | 34.043 | 6.0 | 15 | स्वतंत्र कलाकार | 09.019 | 1.6 |
| 5 | घर आणि इमारत सेवा | 21.732 | 3.9 | 16 | अस्पष्ट किरकोळ व्यापार | 01.143 | 1.4 |
| 6 | वास्तव मालमत्ता | 19.236 | 3.4 | 17 | वैयक्तिक आणि घरगुती वस्तु दुरूस्ती व प्रतिपाल | 07.914 | 1.4 |
| 7 | किराणा माल विक्रेती | 12.412 | 2.2 | 18 | व्यवस्थापन शास्त्रोक्त आणि तांत्रिक सल्ला सेवा विशेष आयोजन सेवा | 06.965 | 1.2 |
| 8 | नेलसलून आणि इतर व्यक्तिगत सेवा | 11.806 | 2.1 | 19 | विशेष आयोजन सेवा | 06.210 | 1.1 |
| 9 | वैद्यकिय सेवा | 11.729 | 2.1 | 20 | दंत वैद्य कार्यालय | 06.092 | 1.1 |
| 10 | ड्रायक्लिनींग आणि लॉड्रीसेवा | 10.624 | 1.9 | 21 | रोजगार सेवा | 05.754 | 1.0 |
| 11 | बांधकाम उद्योग | 10.329 | 1.8 | | | | |
| | **एकुण** | | | | | **3777.007** | **66.9** |

भारतामध्ये उद्योग आणि व्यवसायाच्या बाबतीत महिलामध्ये मोठया प्रमाणावर जागृती होवू लागली आहे. भारतातील महिलांच्या उद्योगातील सहभाग हा 3ps (Pickles, Powder, Papad) यांच्या पुरतीच मर्यादित राहीला नाही. तर आजच्या काळात भारतीय महिला उद्योजक 3ps dMwu 3E (Engineering, Electronice, & Energy) अशा आव्हानात्मक उद्योगाकडे वळू लागल्या आहेत उदा. गुजरात राज्यात महिलांनी सुरू केलेले सोलर कुकरचे प्रकल्प किंवा महाराष्ट्रात फौड्रीसारख्या उद्योगातून प्रवेश करणाऱ्या महिला, तसेच ओरिसासारख्या अप्रगत राज्यातही टी. व्ही. कॅपसिटर्सच्या उत्पादनाकडे वळणाऱ्या महिला तथापि, पारंपारिक व्यवसायापेक्षा अशा आव्हानात्मक अपारंपारिक व्यवसायातील महिला उद्योजकांचे प्रमाण कमी आहे. साधारणपणे खाजगी गृहसेवा शिशुसंगोपन रेस्टारंट आणि पोळीभाजी सारख्या इतर अन्नपदार्थ सेवा इत्यादी उद्योगक्षेत्रामध्ये महिला उद्योजकांचे प्रमाण 8 ते 13 टक्के आहे. म्हणजेच महिला उद्योजकांची संख्या 50000 ते 77000 पर्यत आहे. वास्तव मालमत्ता, ब्युटीपार्लरस, घरबांधणी आणि इमारत सेवा, किराणामाल या उद्योगामध्ये महिला उद्योजकांची संख्या 12000 ते 25000 हजार इतकीच आहे. वैद्यकिय सेवा,ड्रायक्लींग आणि लॉड्री घरगुती आरोग्यसेवा, स्वतंत्र

कलाकार, किरकोळ विक्रते, वस्तु रिपेरिंग, व्यवस्थाप, तात्रिक सेवा, कार्यक्रम आयोजन सेवा, दंतवैद्य सेवा तसेच रोजगार पुरवणाऱ्या सेवा अशा अनेक क्षेत्रात भारतीय महिला उद्योजक एक कार्यक्षम उद्योजक म्हणून वावरताना दिसतात.

**भारतातील महिला उद्योजकता विकास संघटना**

महिला उद्योजकांनी आपल्या विकासासाठी अनेक संघटना स्थापन केल्या आहेत.

1. **भारतीय महिला उद्योजक परिषद (Indian Council of Women Enterprencurs ICWE)**

राष्ट्रीय स्तरावर ही परिषद काम करीत असून भारतातील महिला उद्योजकांना हया परिषदेचे सदस्य होता येते. महिला उद्योजकांच्या विकासासाठी प्रशिक्षण आयोजित करणे, महिला उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी चर्चासत्रे,कार्यशाळा घेणे, प्रकल्प प्रवर्तन करण्यासाठी मार्गदर्शन करणे, राष्ट्रीय पातळीवर महिला उद्योजकांच्या परिषदा संमेलने घेणे, केंद्र सरकारकडे,महिला उद्योजंकाचे प्रश्न मांडणे व प्रतिनिधित्व करणे. भारतीय औद्योगिक विकास बॅक, लघुउद्योग विकास महामंडळ इत्यादी संस्थातर्फे हया परिषदेच्या कार्यक्रमासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. औद्योगिकदृष्टया प्रगत राज्यांमध्ये हया परिषदेच्या शाखा आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, गुजरात, तामिळनाडू येथील परिषदेच्या शाखा उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

2. **भारतीय महिला उद्योजक महासंघ (Federatopm of Indian Women Enterprencurs FIWE)**

भारतातील वेगवेगळया राज्यांमध्ये असलेल्या महिला उद्योजकांच्या संघटनांच्या हा महासंघ आहे. राज्य पातळीवर संघटनानी एकत्र येवून राष्ट्रीय पातळीवर हा महासंघ स्थापन केला आहे. हा महासंघ विशेषकरून लघुउद्योग, गृहउद्योग, व मध्यम उद्योगातील महिलाचे प्रतिनिधित्व करतो. लघु व मध्यम उद्योगक्षेत्रातील महिला उद्योजकांसाठी विभिन्न प्रकारांच्या सोईसवलती मिळवून देणे, त्यांच्यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे, बाजारपेठा मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करणे, इत्यादी कार्य महासंघातर्फे केली जातात. महासंघाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे.

3. **राष्ट्रीय तरूण उद्योजक संघटना (National Alliance of Young Enterprencurs NAYE)**

राष्ट्रीय पातळीवर तरूण महिला उद्योजकांच्या विकासासाठी ही संघटना कार्य करते. राष्ट्रीय परिषदा व संमलने भरविणे, शासनाकडे सवलती व सुविधांसाठी दबाव गट म्हणून प्रयत्न करणे, नवीन तंत्रज्ञान व व्यवसाय संधीबाबत मार्गदर्शन करणे, तरूण महिलासाठी उद्योजकता विकास कार्यक्रम राबविणे इत्यादी स्वरूपाची कार्य संघटनेमार्फत केली जातात.

4. **स्वंयरोजगार महिला संघटना (Self Employed Women Association SEWA)**

स्वयंरोजगार क्षेत्रातील महिला उद्योजकांनी ही संघटना 1972 मध्ये स्थापन केली आहे. वस्तुतः महिला उद्योजकांची ही भारतातील महिला संघटना आहे. स्वयंरोजगार उद्योग क्षेत्र व्यापक असून त्यात अनेक लहान मोठया व्यवसायावर समावेश होतो.

5. **फिकीची महिला शाखा**

इंडियन फेडरेशन ऑफ चेबंर्स ऑफ कॉमर्स ॲड इंडस्ट्रीज राष्ट्रीय पातळीवर हया फेडरेशन महिला उद्योजकासाठी स्वतंत्र शाखा स्थापन केली आहे.

6. **महाराष्ट्र महिला उद्योजक संघटना (In Women Indurstrial Association of maharashtra)**

महाराष्ट्रामधील महिला उद्योजकांची ही संघटना आहे. 1985 मध्ये स्थापना झालेल्या हया संघटनेचे मुख्य कार्यालय पूणे येथे आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक शहरामध्ये हया संघटनेच्या शाखा आहेत. ही संघटना राष्ट्रीय तरूण उद्योजक संघटनेच्या मार्गदर्शनाखाली कार्य करते. हयाच धर्तीवर कर्नाटकमध्ये या संघटनेचे कार्य सुरू आहे. त्यांनी आपल्या संघटनेचे लघुनाम केले आहे. इतर राज्यांमध्ये सुध्दा अशा संस्था कार्यरत आहेत.

**भारतातील उद्योजकतेच्या विविध पातळीवरील संस्था**

**अ. राष्ट्रीय पातळीवरील संस्था**

| संस्था | स्थापना | कार्यालय | संस्था | स्थापना | कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उद्योजकता व लघु व्यवसाय विकास संस्था | 1983 | नवी दिल्ली | राष्ट्रीय तरूण उद्योजक संघटना | ....... | .... |
| भारतीय उद्योजकता विकास संस्था | 1983 | अहमदाबाद | स्वयंरोजगार महिला संघटना | ....... | ....... |
| व्यवस्थापन विकास संस्था | 1973 | हरियाना | औद्योगिक व तांत्रिक महिला संघटना | ........ | ....... |
| राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ | 1955 | नवी दिल्ली | लघुउद्योग सेवा संस्था | 1956 | हैद्राबाद |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लघुउद्योग विकास संस्था | 1954 | नवी दिल्ली | भारतीय औद्योगिक विकास बँक | 1964 | मुबंई |
| खादी व ग्रामोद्योग महामंडळ | 1953 | नवी दिल्ली | ग्रामीण उद्योजकता विकास संस्था | ....... | राची |
| राष्ट्रीय उत्पादकता महामंडळ | 1957 | नवी दिल्ली | भारतीय लघु उद्योग विकास बँक | 1989 | लखनौ |
| उद्योजकता मार्गदर्शन संस्था | ....... | ........ | लघुउद्योग मंडळ | 1957 | नवी दिल्ली |
| राष्ट्रीय लघु उद्योग विस्तार प्रशिक्षण संस्था | 1960 | हैद्राबाद | निर्यात वृध्दी मंडळे व वस्तु मंडळे | ...... | ...... |
| भारतीय महिला उद्योजक परिषद | ....... | नवी दिल्ली | भारतीय गुंतवणूक केंद्र | ...... | ....... |

**ब. राज्य पातळीवरील संस्था**

| संस्था | स्थापना | कार्यालय | संस्था | स्थापना | कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास मंडळ | ....... | मुबंई | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र | 1988 | औरंगाबाद |
| महाराष्ट्र औद्योगिकव तांत्रिक सल्ला संस्था | 1988 | औरंगाबाद | महिला आर्थिक विकास महामंडळ | ...... | मुबंई |
| प्रादेशिक व्यवसाय प्रशिक्षण संस्था | ........ | मुबंई | महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ | ........ | ....... |
| महाराष्ट्र महिला उद्योजक संघटना | ........ | मुबंई | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ | 1962 | मुबंई |
| तांत्रिक सल्ला संघटना | 1972 | ......... | | | |

**क. स्थानिक पातळीवरील संस्था**

1. जिल्हा उद्योग केंद्र स्थापना 1978
2. राष्ट्रीय बॅकांच्या स्थानिक शाखा
3. चेबर्स ऑफ कॉमर्स ॲड इंडस्ट्रीजच्या स्थानिक शाखा
4. जिल्हा सहकारी बॅक
5. रोटरी कल्ब / लायन्स क्लब
6. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या
7. शैक्षणिक संस्था विद्यापीठ व महाविद्यालय
8. स्वयंसेवी सामाजिक संस्था

**महाराष्ट्रातील महिला उद्योजकता विकास :**

औद्योगिक दृष्टया महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टिने महाराष्ट्राचा प्रथम कमांक लागतो. भारतात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये औद्योगिकरणाच्या प्रक्रियेचा फार लवकर प्रारंभ झाला. महाराष्ट्रात सर्व प्रकारचे उद्योग आहेत. दर दिवशी नवनवीन उद्योग स्थापन होत असल्यामुळे महाराष्ट्रातील बहुतेक प्रदेशाचा व शहराचा चेहरा संपूर्ण बदलेला आहे. महाराष्ट्रात उद्योगांची पार्श्वभूमी उत्तम असल्यामुळे उद्योजकांची संख्याही फार झपाटयाने वाढत आहे. अस्तित्वाचे रक्षण आणि जगण्याचा हक्क देताना सरकारने महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सर्वागीण विकासास पूरक ठरणाऱ्या सरकारच्या योजनांमुळे आज विविध क्षेत्रात महाराष्ट्राच्या या तेजस्विनी आपला ठसा उमटवितांना आणि स्वयंसिध्द होतांना दिसत आहेत.

**भारतातील महिला उद्योजकांचे राज्यनिहाय विभाजन**

| राज्य | शेकडा प्रमाण |
|---|---|
| केरळ | 38.00 |
| पंजाब | 33.00 |
| गुजरात | 39.00 |
| उत्तरप्रदेश | 36.00 |
| महाराष्ट्र | 33.00 |

महाराष्ट्रात महिला उद्योजकतेची निकोप वाढ व्हावी. तसेच महिलांनी आपल्या व्यवसायाची रितसर नोंद करावी. व्यावसायाची वाढ व प्रसिध्दी करावी अशा अनेक हेतूने आज महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲन्ड ॲग्रीकल्चर

मुंबइ, पूणे व सांगली शाखा ,विमा,सेवा, माविम, इत्यादी संस्था तसेच पदवी व व्यवस्थापकीय महाविद्यालये महिला महाविद्यालये इत्यादीद्वारे परिषद, कार्यशाळा, परिसंवाद आयोजित केली जातात. यामध्ये महिला उद्योजकांना सामावून घेवून त्यांचा सन्मान केला जातो. यशस्वी उद्योजिकांना शासनाकडून विविध संस्थाकडून यशस्वी उद्योजिका म्हणून प्रसिध्दी मिळते. परिसंवाद, परिचर्चा, कार्यशाळा, इत्यादी ठिकाणी महिला उद्योजकांची आकडेवारीही उल्लेखनीय आहे.

## संदर्भ

1. *देशपांडे, लिमये आणि मानकर .2001. उद्योजकतेची मुलतत्वे, कोल्हापूरः फडके प्रकाशन, पान नंबर 125*
2. *देशमुख प्रभाकर .2008. उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार, नागपूरः पिंपळापुरे प्रकाशन, पान नंबर 260 व 261*
3. *Wasanthagopal and Santhas .2010. Women entrepreneurs in india, New Delh: New Centaury Publishing House, page No- 19*
4. *Wasanthagopal and Santha .2010. Women entrepreneurs in india, New Delh: New Centaury Publishing House, page No- 14*
5. *जोशी सी. जे आणि जोशी एस .1998. उद्योजकतेची मुलतत्वे, कोल्हापूरः फडके प्रकाशन, पानं नं 97*
6. *जोशी सी. जे आणि जोशी एस .1998. उद्योजकतेची मुलतत्वे, कोल्हापूरः फडके प्रकाशन, पानं नं 98*
7. *महिला आर्थिक विकास महामंडळ, वार्षिक अहवाल 2009 ते 2010 मुंबई*